दैनिक
wwww.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड वर्ष - ०४ थे अंक ५० बुधवार ४ फेब्रुवारी २०२६ RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 पान ४ किंमत २ रू
Beed year - ०4 th Issue50 Wednesday4February 2026 RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 Page 4 Price 2

# बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी सुनेत्रा पवार यांची नियुक्ती

**बीड:** **विशेष प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील एक मोठी घडामोड समोर आली असून, बीड जिल्ह्याच्या रिक्त असलेल्या पालकमंत्रीपदाची धुरा अखेर राज्याच्या उपमुख्यमंत्री *ना. सुनेत्रा पवार* यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. राज्य सरकारने ३ फेब्रुवारी २०२६ रोजी याबाबतचा अधिकृत शासन निर्णय निर्गमित केला. अजित पवार यांच्या निधनानंतर जिल्ह्याचे पालकत्व कोणाकडे जाणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. या नियुक्तीमुळे बीड जिल्ह्याला तिसऱ्या महिला पालकमंत्री मिळाल्या असून, प्रशासकीय वर्तुळात आणि राजकीय क्षेत्रात या निर्णयाचे स्वागत होत आहे.

***जिल्ह्याच्या राजकारणात ऐतिहासिक निर्णय***

बीड जिल्ह्याला महिला नेतृत्वाचा मोठा वारसा लाभलेला आहे. यापूर्वी डॉ. विमल मुंदडा आणि पंकजा मुंडे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून यशस्वी कारकीर्द गाजवली आहे. आता सुनेत्रा पवार यांच्या रूपाने जिल्ह्याला अनुभवी आणि कणखर नेतृत्व मिळाले आहे. सुनेत्रा पवार यांच्याकडे बीडसोबतच पुणे जिल्ह्याचेही पालकत्व सोपवण्यात आल्याने त्यांच्यावरील जबाबदारी मोठी आहे.

***बीड**



**जिल्ह्यासमोरील आव्हाने आणि अपेक्षा**

बीड जिल्हा हा प्रामुख्याने शेती आणि कष्टकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. नव्या पालकमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांच्यासमोर अनेक महत्त्वाची आव्हाने असणार आहेत:

१. दुष्काळ आणि पाणीप्रश्न: जिल्ह्याचा कायमस्वरूपी पाणीप्रश्न सोडवण्यासाठी रखडलेले जलप्रकल्प पूर्ण करणे ही त्यांची प्राथमिकता असेल.

२. ऊसतोड कामगारांचे प्रश्न: बीड हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. त्यांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि विमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

३. औद्योगिक विकास: जिल्ह्यात मोठ्या उद्योगांची वानवा असल्याने तरुणांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. सुनेत्रा पवार यांच्या अनुभवाचा फायदा जिल्ह्याला नवीन उद्योग खेचून आणण्यासाठी होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.**बीड जिल्ह्याला सुनेत्रा पवार यांच्यासारखे अभ्यासू नेतृत्व मिळाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील आणि विकासाची नवी पहाट उजाडेल, असा आम्हाला विश्वास आहे."**

**> — *स्थानिक राजकीय पदाधिकारी, बीड.**

## अजितदादांचा वारसा आणि सुनेत्रा वहिनींचे कर्तृत्व'

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बीड जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांच्या काळात जिल्ह्याच्या अनेक विकासकामांना गती मिळाली होती. आता तोच वारसा पुढे नेत, सुनेत्रा पवार जिल्ह्याच्या विकासाचा रथ कसा पुढे नेतात, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. पुण्यासारख्या मोठ्या जिल्ह्याचा अनुभव गाठीशी असल्याने प्रशासनावर पकड मिळवणे त्यांना सोपे जाईल, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

## थांब, तुझी एन्क्वायरीच लावतो, भरसभेत आमदार तानाजी सावंत यांचा बंडखोर उमेदवाराला दम

"थांब, तुझ्यावर एन्क्वायरी लावतो," अशा शब्दांत राज्याचे माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांनी भरसभेत बंडखोर उमेदवाराला जोरदार दम भरला. धाराशिव जिल्ह्यातील पारा जिल्हा परिषद गटात झालेल्या सभेत तानाजी सावंत यांनी विरोधी उमेदवारावर थेट टीका केली. सभा स्थळी येताना रस्त्यांच्या दुरवस्थेवरून संताप व्यक्त करत, जनतेला वेठीस धरू नका असा इशारा त्यांनी दिला. आपलाच जुना कार्यकर्ता बंडखोरी करून अपक्ष म्हणून रिंगणात उतरल्याने तानाजी सावंत (Tanaji Sawant Warned Candidate) आक्रमक झाले. "महाराष्ट्र फिरवलेला हा तानाजी सावंत आहे, माझा नाद करायचा नाही," असे म्हणत त्यांनी बंडखोर उमेदवारावर निशाणा साधला. धाराशिव जिल्ह्यातील पारा जिल्हा परिषद गटात ही सभा झाली. त्यावेळी त्यांनी रस्त्याच्या दुरावस्थेवरून विरोधकांना खडसावले. आज रस्त्यांची काय अवस्था करून ठेवली आहे. मी रस्त्यावरून आलो. तो रस्ता विरोधक आपणच




केल्याचा दावा करत आहेत. तुझ्या बापानं निधी आणला का? महाराष्ट्र सरकारचा पैसा आहे, निधी मी आणला. थांब आता तुझी चौकशीच लावतो. माझा नाद करायचा नाही. मी मी म्हणणाऱ्यांची मी जिरवली आहे, असा सज्जड दम आमदार तानाजी सावंत यांनी भरला. जुन्या कार्यकर्ता बंडखोरी करून अपक्ष निवडणूक लढवत असल्याने तानाजी सावंत आक्रमक झाल्याचे दिसले. ओमराजे निंबाळकरांवर मोठी टीका भाजपा आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना निवडून आणण्याचे ओमराजे निंबाळकर यांचे प्लॅनिंग आहे का अशी लोकात कुजबुज असल्याचा दावा राष्ट्रवादीच्या नेत्या सक्षणा सलगर यांनी केलाय. तेर जिल्हा परिषद गटाच्या लढतीवरून सक्षणा सलगर यांनी काही प्रश्न उपस्थित केलेत. तेर मध्ये महाविकास आघाडी व्हावी ही सर्व कार्यकर्त्यांची इच्छा होती मग ओमराजे निंबाळकर यांनी त्याला केराची टोपली का दाखवली ? , त्यांना नेमकं कोणाला निवडून आणायचे विरोध फक्त दाखवण्यासाठी आहे का? असा सवाल करत त्यांनी निशाणा साधला. तर जिल्हा परिषद निवडणूक न लढण्याची घोषणा करून अर्चना पाटील पुन्हा मैदानात का ? राणा जगजितसिंह पाटील आणि अर्चना पाटलांनी पक्ष खुंटीला बांधला अशी टीका सलगर यांनी केली. धाराशिव जिल्ह्यातील तेर जिल्हा परिषद गटात हाय व्होल्टेज लढत होतेय . ठाकरे शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी असा तिरंगी सामना आहे. राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील भाजपकडून तेर जिल्हा परिषद गटातून निवडणूक आखाड्यात आहेत. तर राष्ट्रवादीकडून सक्षणा सलगर उमेदवार असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाही स्वतंत्र उमेदवार रिंगणात आहे.

## खरीप-२०२५ चा पिक विमा द्या - संभाजी ब्रिगेडची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)
गतवर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गतवर्षी अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या मूग, कापूस, तूर, बाजरी, ज्वारी इत्यादी या पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. विशेष करून महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्यामुळे सोयाबीन या पिकाचे उत्पादन कमी झाले आहे. यलो मोझॅक व्हायरस अनेक भागात पसरल्यामुळे सोयाबीन पिकासाठी तो घातक ठरला आहे. म्हणून सोयाबीन उत्पादन कमी झाले आहे. या सर्व गोष्टींचा शासनाने विचार करून सोयाबीन पिकासाठी १०० टक्के पिक विमा देण्यात यावा. अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सोमवारी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांना सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गतवर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या मूग, कापूस, तूर, बाजरी, ज्वारी इत्यादी पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. विशेष करून महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्यामुळे सोयाबिन पिकांचे उत्पादन कमी झाले आहे. यलो मोझॅक व्हायरस अनेक भागात पसरल्यामुळे सोयाबीन पिकासाठी तो घातक ठरला



आहे. म्हणून सोयाबिन उत्पादन कमी झाले आहे. या सर्व गोष्टींचा शासनाने विचार करून सोयाबीन पिकासाठी १०० टक्के पिक विमा देण्यात यावा. तसेच सलग २-३ महिने अतिवृष्टी झाल्यामुळे ऊस पिकाला सूर्य प्रकाश व पुरेसा ऑक्सीजन मिळाला नाही. म्हणून ऊसाचे टनेज घटले आहे. म्हणून साखर कारखानदार यांनी केंद्र सरकारने ९.५ रिकव्हरीसाठी एफ.आर.पी. एका टनाला ३,५५०/- रूपये ठेवले आहे. तसेच ९.५ पेक्षा कमी रिकव्हरी असेल तर एफ.आर. पी. एका टनाला ३,२९०/- रूपये ठेवली आहे. म्हणून साखर कारखानदार यांनी कमीत कमी एका टनाला ३,५५०/- रूपये द्यावेत. तसेच शेतकऱ्यांच्या पुढील मागण्या मान्य कराव्या. १) खरीप २०२५ चा पिक विमा १०० टक्के द्यावा, २) महाराष्ट्रातील शेतकरी आहेत देशात सर्वाधिक कर्जबाजारी म्हणून सरकारने शेतकरी यांचे संपूर्ण सरसगट कर्ज माफ करावे., ३) पिक विम्याची सरासरी ५ वर्षांची उंबरठा उत्पादनाची मर्यादा रद्द करून ज्यावर्षी जेवढे नुकसान झाले आहे. तेवढी नुकसान भरपाई शासनाने पिक विमा कंपनीला देण्यास सांगावे., ४) स्वामीनाथन आयोग लागू करावा., ५) पंतप्रधान पिक विमा योजना रद्द करून इर्मा कायदा लागू करावा., ६) साखर कारखानदार यांनी ऊसाला पहिली उचल ३,७५१/- रूपये द्यावी., ७) उसाला एका टनाला ५,०००/- रूपये भाव द्यावा., ८) मुख्यमंत्री महोदय म्हणतात की, काही साखर कारखाने काटे मारतात म्हणून महाराष्ट्र शासनाने सर्व कारखान्याचे काटे ऑनलाईन करावेत. महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने यांचे काटे नियमितपणे तपासून जे कारखाने काटे मारतात त्यांचे परवाने रद्द करून त्या कारखान्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. जर शासनाने शेतकऱ्यांच्या सदर निवेदनातील मागण्या मान्य नाही केल्या तर, बीड जिल्ह्यातील शेतकरी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत भाजप व त्यांचे मित्र पक्षांना मतदान करणार नाहीत. त्यामुळे या मागण्या पुढील आठ ते दहा दिवसांत मान्य कराव्यात अन्यथा अंबाजोगाई संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्य सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रतीलिपी १) तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, २) अतिरीक्त जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर प्रविण उत्तमराव ठोंबरे (विभागीय सचिव-संभाजी ब्रिगेड बीड, लातूर, धाराशिव.), रामकिसन मस्के (माजी जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, बीड पुर्व.), श्रीमती सुनंदा लोखंडे (जिल्हाध्यक्षा महिला आघाडी, संभाजी ब्रिगेड बीड.), नारायणराव मुळे (जिल्हा सचिव, संभाजी ब्रिगेड, बीड.), श्रीमती प्रगती जगताप (तालुकाध्यक्षा, संभाजी ब्रिगेड, अंबाजोगाई.), केशव टेहरे (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, बीड), सतिष कुंडगर (जिल्हा उपाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, बीड), नुर शेख (तालुकाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी.), संजय डिघोळे, अंकुशराव ढोबळे (नेते, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष), रामकृष्ण पवार गुरूजी, ॲड.प्रशांत पवार आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

### स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो- गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे

केज प्रतिनिधी: दि. ३ फेब्रुवारी- जीवन विकास शिक्षण मंडळ केज, संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] केज या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षांमधील स्नेहसंमेलन कार्यक्रम अत्यंत हर्षोत्साहत पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सुनील केंद्रे गटशिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र पंचायत समिती केज तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून सिताताई बनसोड नगराध्यक्षा, नगरपंचायत केज या उपस्थित होत्या. तर इतर प्रमुख उपस्थितीमध्ये अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ तथा सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, संस्थेचे सचिव जी.बी. गदळे, नारायणराव अंधारे संस्थेचे संचालक तथा अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती [ स्वयंअर्थसहायित शाळा ] शैलाताई इंगळे अध्यक्षा, शालेय व्यवस्थापन समिती [ मा. वि. ] केज, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राथमिक विभागाचे मु. अ. वसंत शितोळे, गणेश कोकीळ संस्थेचे सहसचिव तथा मु. अ. स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज, शंकर भैरट प्राचार्य स्व. प्रमोद महाजन कनिष्ठ महा. केज संघपाल मस्के



मु. अ. स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ स्वयंअर्थसहायित शाळा ] आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उदघाटक गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे व शाळेतील विद्यार्थिनी यांच्या परंपरागत वंदनीय अभ्यागतम, सुस्वागतम या स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना सुनील केंद्रे म्हणाले, स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधून आदर्श कलाकार घडतात. जीवनामध्ये कोणतीही गोष्ट अशक्य नसते परंतु ती मिळविण्यासाठी आपण सदैव कार्यमग्न असावे लागते. अध्यक्षीय समारोपात सिताताई बनसोड म्हणाल्या, या शाळेमध्ये खरोखरच केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य देखील रुजवले जातात. अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून आपल्या देशाची खरी संस्कृती, परंपरा जोपासली जाते. सहभागी विद्यार्थ्यांनी शेतकरी, लोकगीत, राजस्थानी घूमर लोकगीत, काश्मिरी लोकनृत्य, मराठमोळी लावणी नृत्य, सादर केली. पोतराज लोकनृत्य प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरले. या नृत्यांमध्ये शाळेतील सहशिक्षक प्रबोधकांत समुद्रे यांनी देखील विद्यार्थ्यासमवेत पोतराज साकार केला. मराठी, हिंदी, लोकगीत, गोंधळ, भारुड अशा विविध गीतावर नृत्य सादर करून महाराष्ट्राची संस्कृती व परंपरांचे दर्शन उपस्थित प्रेक्षकांना झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे, सहाय्यक कल्याण आदमाने यांनी केले.

## हिमायत फाउंडेशनकडून अपघातग्रस्त इमाम शेख इसाक अहमद यांना ₹५०,०००ची आर्थिक मदत...!

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील डोंगरकिनी या गावातील अत्यंत गरीब परिस्थितीत राहणारे आणि एका मशिदीचे इमाम म्हणून सेवा देणारे शेख इसाक अहमद यांना गंभीर अपघातानंतर उपचारासाठी हिमायत फाउंडेशनकडून ₹५०,००० ची आर्थिक मदत देण्यात आली.
शेख इसाक अहमद हे आपल्या नियमित आरोग्य तपासणीसाठी रुग्णालयात जात असताना, कमी दृष्टीमुळे त्यांचा अपघात झाला. अपघातानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केली, मात्र मधुमेहाच्या (साखरेच्या) पातळीत सतत चढ-उतार होत असल्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली नाही.
शेख इसाक अहमद हे आपल्या कुटुंबातील एकमेव कमावते सदस्य असून त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. उपचाराचा वाढता खर्च आणि उत्पन्नाचा स्रोत बंद झाल्यामुळे कुटुंबावर मोठे संकट ओढावले होते.
ही बाब लक्षात येताच हिमायत फाउंडेशन, गेवराई यांनी सामाजिक बांधिलकी जपत शेख इसाक अहमद यांच्या कुटुंबाला ₹५०,००० ची आर्थिक मदत चेक स्वरुपी केली. या मदतीमुळे त्यांच्या उपचारासाठी आणि कुटुंबाच्या दैनंदिन गरजांसाठी मोठा आधार मिळाला आहे.



हिमायत फाउंडेशनने याआधीही अनेक गरजू, गरीब आणि संकटग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला असून, भविष्यातही अशीच सामाजिक सेवा सुरू ठेवण्याचा निर्धार फाउंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.
यावेळी हिमायत फाउंडेशन चे अध्यक्ष मुफ्ती उमर कुरेशी, मौलाना ताहेर मक्की, मौलाना अब्दुल हकीम पाटोदा बदर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक सय्यद एजाज सर फाउंडेशन चे सचिव शेख मुजीब,लुकमान खान, अब्दुल खवी व गावातील जेष्ठ व तरून समाज बांधव उपस्थित होते.

# विवाहितेचा अमानुष छळ..... पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

### हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा अमानुष छळ पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल लैंगिक छळ, जीवे मारण्याची धमकी व कौटुंबिक हिंसाचाराचे गंभीर आरोप

अहिल्यानगर - हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहानंतर अवघ्या काही दिवसांतच छळाला सुरुवात झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. फिर्यादी महिलेचा विवाह दि. 28 एप्रिल 2025 रोजी प्रतिक हेमंत बेंद्रे (रा. देशमुख वस्ती, आंबळे, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्याशी अहिल्यानगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात रजिस्टर पद्धतीने झाला होता. त्यानंतर हॉटेल रेडियन्स येथे मोठ्या थाटामाटात विवाह समारंभ पार पडला होता. विवाहात फिर्यादीच्या वडिलांनी संसारोपयोगी साहित्य, दागिने, मंगळसूत्र, कर्णफुले, पैजन तसेच पतीस रोख एक लाख रुपये व सोन्याची अंगठी दिली होती. विवाहासाठी सुमारे 15 ते 20 लाख रुपयांचा खर्च केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. विवाहानंतर सुरुवातीचे चार-पाच दिवस सासरी नीट वागणूक देण्यात आली. मात्र त्यानंतर सासू अनुपमा बेंद्रे व नणंद सुप्रिया चौधरी यांनी माहेरकडून कमी सोने दिल्याचे टोमणे मारण्यास सुरुवात केली. "मोठ्या सुनेने घरातील सर्व फर्निचर व सामान आणले आहे, तुझ्या वडिलांनी काहीच दिले नाही," असे म्हणून वारंवार 15 तोळे सोने आणण्याची मागणी करण्यात येत होती. तसेच जाव प्रियंका बेंद्रे हिने घरातील सर्व जड व हलकी कामे जबरदस्तीने करून घेत शेतातील कामासाठीही पाठवले. काम न केल्यास उपाशी ठेवणे, आजारी असतानाही उपचार न करणे, असा अमानुष छळ केल्याचा आरोप आहे. तक्रारीत मानलेले मामे सासरे प्रशांत घोरपडे यांच्याकडून लैंगिक छळ झाल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अंघोळीच्या वेळी जबरदस्तीने जवळ बोलावणे, शरीराला स्पर्श करणे, हात पकडणे, अश्लील वर्तन करणे, अशा घटना वारंवार घडल्याचे फिर्यादीने सांगितले. याबाबत पतीकडे तक्रार केल्यानंतरही त्याने संरक्षण देण्याऐवजी छळात साथ दिल्याचे नमूद आहे. भाऊ पवन बेंद्रे यानेही अश्लील नजर टाकणे, अंगावर हात फिरवणे, विरोध केल्यास मारहाण करणे, असा प्रकार केल्याचा आरोप आहे. पती प्रतिक बेंद्रे याने "घरातील सर्व निर्णय माझ्याच माणसांचे चालतात," असे म्हणत फिर्यादीला धमकावले व माहेरहून पैसे आणण्याचा दबाव टाकला. दि. 5 ऑगस्ट 2025 रोजी तब्येत बरी नसतानाही फिर्यादीला शेतातील विहिरीजवळ नेऊन "15 तोळे सोने व 10 लाख रुपये आणले नाहीत तर विहिरीत ढकलून आत्महत्येचा बनाव करू," अशी जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आहे. घाबरून फिर्यादी व तिच्या वडिलांनी पोलीस हेल्पलाईन 112 वर संपर्क साधला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत फिर्यादीला सुरक्षितपणे बाहेर काढले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पती प्रतिक बेंद्रे, सासू अनुपमा बेंद्रे, भाऊ पवन बेंद्रे,



जाव प्रियंका बेंद्रे, नणंद सुप्रिया चौधरी, मानलेले मामे सासरे प्रशांत घोरपडे व अरविंद घोरपडे यांच्याविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी प्रतिबंधक कायदा, शारीरिक व मानसिक छळ तसेच लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहे

## संपादकीय

## मुलीची चतुराई

सदाभाऊ ऊर्फ आप्पा मोरे हे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती. एक प्रयोगशील शेतकरी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांनी त्यांच्या 4 - 5 एकर जमिनीत सतत प्रयोग करीत वेगवेगळी पिके आतापर्यंत घेतली होती. त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही होते. आजुबाजूच्या गावातील कित्येक शेतकरी त्यांचा सल्ला घ्यायला येत. आप्पा ही आलेल्या सर्वांना आपलेपणाने मार्गदर्शन करीत असत. ठिबक सिंचन , तुषार सिंचन प्रकल्प राबवित पाण्याची कमतरता असूनही ते आपली शेती , बागायत उत्तम प्रकारे फुलवीत होते.

आप्पांचे कुटुंबही छोटे होते. एकुलती एक मुलगी आणि पत्नीसह ते वाडीतच घर बांधून राहत होते. अगदी सुखी समाधानी असे त्यांचे कुटुंब होते... पण निसर्गाचं चक्र फिरतं आणि लागोपाठ ३-४ वर्षे दुष्काळ पडतो. नीट नियोजन करण्याच्या आप्पांच्या सवयीमुळे पहिली तीन वर्षे ते नीट सांभाळून घेतात...पण चौथ्या वर्षी त्यांच्याकडचे सगळे धान्य, पैसे , बी - बियाणे संपून जाते. शेवटी सावकाराकडून कर्ज घेण्याची वेळ येते. पुन्हा दुष्काळ पडतो. आता परिस्थिती अगदीच हाताबाहेर जाते. त्यात सावकार पैशासाठी तगादा लावतो. एकदा सावकार आप्पांच्या घरी पैसे वसुलीसाठी येतो. त्यावेळी आप्पांच्या सुंदर मुलगी त्याच्या दृष्टीस पडते आणि त्याची नियत बिघडते. आप्पाला तो अट घालतो ..तुझ्या मुलीशी माझं लग्न लावून दे . तुझं कर्ज माफ करतो.

आप्पांना ते ऐकून धक्काच बसतो. तो साफ इन्कार करतो. आठ दिवसात तुझा विचार कळव नाहीतर तुझं सगळं शेत माझ्या ताब्यात घेईन अशी तंबी देऊन सावकार निघून जातो.

आप्पा गावातील काही ज्येष्ठ वडिलधाऱ्या माणसांशी सल्ला मसलत करतात. सगळा गाव आप्पांच्या मागे उभा राहतो... आप्पा चांगला माणूस आहे. तो तुमचं कर्ज फेडेल अशी ग्वाही देत अशी विचित्र अट घालू नका अशी विनवणी गावातील वडीलधारी मंडळी सावकाराकडे करतात. गावकऱ्यांचा आप्पाला इतका पाठिंबा आहे हे जाणून तो नवीन गोष्ट सुचवतो. सगळ्या गावकऱ्यांसमोर तो एक अट घालतो. मी दोन्ही हातात दोन दगड घेईन... एक पांढरा , एक काळा. काळा दगड घेतलेला हात तीने उघडला तर तीला माझ्याशी लग्न करावे लागेल आणि आप्पाचे सर्व कर्ज फिटेल...वर दुसऱ्या वर्षासाठी शेतीच्या कामासाठी पैसेही मिळतील. पण , पांढरा दगड घेतलेला हात तीने उघडला तर लग्न करण्याची अट राहणार नाही..शेतीसाठी मदतही मिळेल. बघ , दुहेरी फायदा होईल.

आपापसात चर्चा करून आप्पा व गावकरी यासाठी तयार होतात. सर्व गाव गोळा होतो. आप्पांच्या मुलीला आणले जाते. सावकार आधीच दोन्ही हातात दगड घेऊन बसलेला असतो.

आप्पाची मुलगी जितकी देखणी असते तितकीच हुशार व चलाख असते. सावकाराचा कावा ती बरोबर ओळखते... आणि मनाशी शांत राहून सावधपणे वागायचे ठरवते.

सावकाराने गावकऱ्यांची नजर चुकवून दोन्ही हातात काळे दगड ठेवले होते. मुलीला हात उघडायला सांगितले जाते. ती एक हात उघडून शिताफीने दगड खाली टाकते... आणि बावरल्याचा अभिनय करीत थरथरल्या स्वरात म्हणते ..चुकून पडला दगड. पण मी काही पाहिला नाही त्यामुळे काळा की पांढरा काहीच कळले नाही. थोडा धीर एकवटून ती पुढे बोलते .. आपण आता हा हात उघडून बघू म्हणजे ह्या हातात कोणता दगड आहे हे कळल्यावर पडलेला दगड कोणता हे समजेल. सावकार यावर काहीच बोलू शकत नाही. तीने दुसरा हात सर्वांसमोर उघडला तर काळा दगड निघाला.. तेव्हा गावच्या सरपंचाने निर्णय दिला .. पहिल्या उघडलेल्या हातातला दगड पांढरा होता.

अश्या प्रकारे आप्पांच्या मुलीच्या चलाखीने वागल्यामुळे संकट टळते. सावकाराशी लग्नही करावे लागत नाही. कर्जही फिटते आणि पुढच्या वर्षीचा शेतीसाठी खर्चही मिळतो.

सारांश : कोणत्याही परिस्थितीत मनाचा तोल जाऊ न देता शांतपणे निर्णय घेतला की सर्व चांगलं होतं. घाबरून जाऊ नये. डगमगू नये.

सरोज भिडे
विरार , जिल्हा पालघर

# लेवा पाटीदार समाज, बदलापुरआयोजीत हरिहरेश्वर सहल.

बदलापूर:(प्रतिनिधी:सुनिल इंगळे) रायगड जिल्ह्यातील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र हरिहरेश्वर येथे झालेली सहल मनाला खूपच समाधान देणारी ठरली.निसर्गाचं सौंदर्य, समुद्राची अथांगता आणि मंदिरातील शांत,पवित्र वातावरण यांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळाला.हरिहरेश्वर मंदिरातील भगवान शंकराचं दर्शन घेताना मन नकळत शांत झालं.समुद्राच्या लाटांचा आवाज आणि वाऱ्याची मंद झुळूक मनातील सगळी धावपळ विसरायला लावत होती. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडा वेळ बाजूला काढून निसर्गाच्या सान्निध्यात राहणं किती आवश्यक आहे,याची जाणीव या सहलीमुळे झाली.सहकाऱ्यांसोबत,मित्र-मैत्रिणींसोबत, कुटुंबासोबत व समाज बांधवांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण आनंदाने भरलेला होता.हसणं,गप्पा, फोटो काढणं आणि समुद्रकिनारी फेरफटका मारणं या सगळ्यामुळे आठवणींचा सुंदर ठेवा तयार झाला.ही केवळ एक सहल नव्हती,तर मन,शरीर आणि आत्म्याला ताजंतवानं करणारा एक अनुभव होता. हरिहरेश्वरची ही भेट कायम स्मरणात राहील,अशीच होती.

# सेवाग्राम येथे वृक्षवेल राज्यस्तरीय कवी संमेलन

दिनांक: 1फेब्रुवारी 2026 ला सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान येथे वृक्षवेल राज्यस्तरीय साहित्य मंच महाराष्ट्र भारत या समूहाचे राज्यस्तरीय कवी संमेलन आयोजित करण्यात आले. वृक्षवेल राज्यस्तरीय दुसरे कवी संमेलनचे अध्यक्ष श्री प्रा. डॉ.चिंतामण कोंगरे हे होते तर उद्घाटक श्री सुधीरभाऊ पांगुळ नगराध्यक्ष नगर परिषद वर्धा सहउद्घाटक श्री विपीनकुमार मोघे हे होते. प्रमुख मान्यवर श्री बाबाराव तुराळे, श्री मुरलीधर बेलतोडे संचालक निसर्ग सेवा समिती वर्धा, सौ सुजाताताई ताकसांडे सरपंच सेवाग्राम, श्री नागनाथ बडे मराठी भाषा संमेलन अध्यक्ष, श्री योगेश तांदूळकर हिंदी भाषा संमेलन अध्यक्ष,डॉ ॲड श्री पी डी काटकर इंग्रजी भाषा प्रा नरेंद्र पोतदार प्रमुख मान्यवर व आयोजक श्री किशोरकुमार मलेवार राज्य अध्यक्ष वृक्षवेल राज्यस्तरीय साहित्य मंच महाराष्ट्र भारत,श्री संजय येरने राज्यसचिव, श्री नागनाथ बडे राज्यउपाध्यक्ष श्री योगेश तांदूळकर समीक्षक होते.

राज्यस्तरीय कवी संमेलन ची सुरुवात महापुरुषाने लावले वृक्ष या विषयांच्या अनुषंगाने महापुरुषाने लावलेले वृक्षदर्शन करून करण्यात आली. कवी संमेलनात मान्यवरांचे हस्ते फीत कापण्यात आली. वृक्षाचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. खरा तो एकच धर्म या प्रार्थना गीताने सुरुवात करण्यात आली. कविवर्य श्री बाबाराव तुराळे यांच्या सेवाग्राम नगरीत हा स्वागत गीत घेण्यात आला. मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

कवी संमेलन व वृक्षसंवर्धन या विषयावर श्री मुरलीधर बेलतोडे संचालक निसर्ग सेवा समिती वर्धा,श्री विपिनकुमार मोघे संचालक जयहिंद संस्था, श्री सुधीरभाऊ पांगुळ नगराध्यक्ष नगर परिषद वर्धा यांनी उद्घाटनीय मार्गदर्शन केले. उत्कृष कार्याविषयी सन्माननीय कवी कवयित्री,साहित्यिक, लेखक,वृक्षप्रेमी,आदर्श शिक्षक, व्यसनमुक्ती अश्या अलौकिक कार्य करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींना वृक्षवेल राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ देऊन मान्यवरांचे हस्ते वृक्षवेल सन्मानपत्र,सन्मानचिन्ह, दोन पुस्तके वृक्ष बिज पॉकेट देऊन गौरविण्यात आले.

वृक्षवेल राज्यस्तरीय कवी संमेलन अविस्मरणीय: वृक्षवेल राज्यस्तरीय साहित्य मंच महाराष्ट्र भारत या समूहाचे दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान बापू कुटी सभागृह सेवाग्राम जिल्हा वर्धा येथील कवी सम्मेलनात गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, वाशिम, हिंगोली, नांदेड,बीड जळगाव या जिल्ह्यातील ६१ सन्माननीय कवी कवयित्री यांनी वृक्षवेली, निसर्गाचे योगदान, व्यसनमुक्ती या विषयावर बहारदार रचना सादर करणारे सन्माननीय कवी कवयित्री यांना वृक्षवेल सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,दोन पुस्तके,वृक्ष बिज पॉकेट देऊन गौरविण्यात आले. वृक्षवेल राज्यस्तरीय कवी संमेलनामध्ये

७३ सन्माननीय पुरस्कार्थी, कवी कवयित्री यांनी सहभाग नोंदवला आहे.

दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलनचे समारोप: वृक्षवेल राज्यस्तरीय कवी संमेलनचे संचालन श्री किशोरकुमार मलेवार यांनी केले तर सर्व सन्माननीय कवी कवयित्री साहित्यिक सम्मेलन अध्यक्ष भाषावार अध्यक्ष यांचे आभार श्री संजय येरने यांनी मानले.

व वंदेमातरम् या गीताने वृक्षवेल राज्यस्तरीय साहित्य मंच महाराष्ट्र भारत या समूहाचे राज्यस्तरीय दुसरे कवी संमेलनाचे समारोप करण्यात आले.

# संविधान जागर मकर संक्रांति स्पेशल संविधान दया! संविधान घ्या !

भिडेवाडाकार ,फुलेप्रेमी , संविधान दूत , जिल्हा परिषद शिक्षक आदरणीय श्री . विजय वडवेराव सर यांच्या संकल्पनेतून संविधान दया ! संविधान घ्या हा उपक्रम घेण्यात आला . विज्ञान गणित माध्यमिक सहशिक्षिका/ कवयित्री/ सूत्रसंचालिका/ संविधान दूत सौ .सुनिता अरविंद महाजन यांनी २४ जानेवारी २०२६ रोजी श्री व सौ साटम यांच्या घरगुती हळदीकुंकू समारंभात "तिळगुळ घ्या, गोड गोड बोला " या ब्रीदवाक्यासह, प्रत्यक्ष संविधानाचा ग्रंथ हाताळायला देऊन उपस्थित महिला भगिनींना संविधानाच्या विचारांचे वाणही दिले . आणि सविधान जागर हा उपक्रम संपन्न केला.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला दिलेल्या संविधान ग्रंथातील माहिती सुरुवातीला देण्यात आली. त्यानंतर संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांची इत्यंभूत माहिती देऊन उपस्थित महिला भगिनींना संविधानिक वाण देऊन विचारांची देवाण-घेवाण करण्यात आली. तसेच आजच्या काळाची गरज ओळखून संविधानदुताची भूमिका सांगण्यात आली. अतिशय उपयुक्त अशी माहिती सदर कार्यक्रमातून मिळाल्यामुळे , उपस्थित सर्व महिला भगिनींनी सदर उपक्रमाचे आयोजक श्री .विजय वडवेराव सर आणि संविधानदूत म्हणून उपक्रम घेणाऱ्या सौ. सुनिता महाजन यांचे आदरपूर्वक आभार मानले.

# पारंबी विद्यालयात पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन

नवीन माध्यमिक विद्यालय पारंबी येथे नुकतेच पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले या सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ.शिवचरण उज्जैनकर होते याप्रसंगी शिक्षक श्री संतोष ठाकूर यांनी प्रास्ताविका मध्ये पालक शिक्षक पालक मेळाव्याची आवश्यकता आणि विविध विषयाच्या समित्या स्थापन करणे बाबत त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता सुधारणे बाबत आणि इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेसंदर्भात व प्रात्यक्षिक परीक्षा विषयी सुद्धा माहिती देऊन मार्गदर्शन केले. प्रसंगी पालकांनी सुद्धा विद्यार्थ्यां विषयी समाधान व्यक्त करून काही सूचना केल्यात याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केलेत शेवटी आपल्या अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी याप्रसंगी दिनांक 20 फेब्रुवारी ते 18 मार्च यादरम्यान होणार असल्याने विद्यार्थ्यां सोबतच पालकांनी सुद्धा आपल्या पाल्यांना या कालावधीमध्ये त्यांच्याकडे विशेष लक्ष देऊन काळजी करणं करण्याची गरज असल्यास गरज असून त्यांची आरोग्याची सुद्धा काळजी करावी परीक्षेचा टाइम टेबल विद्यार्थ्यांच्या हॉल तिकीट सोबतच दिलेला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी हॉल तिकीट दररोज आपल्याजवळ असू द्यावे आणि पेपरला अर्धा तास अगोदर शिवाजी हायस्कूल कुऱ्हा काकोडा या केंद्रावर उपस्थिती द्यावी कुठल्याही कॉपी ला आपण बळी पडू नये कॉपीमुक्त अभियाना अंतर्गत आपण विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांकडून कॉपीमुक्त परीक्षेची शपथ घेतलेली असून गावामधून सुद्धा आपण कॉपीमुक्त अभियानांतर्गत प्रभात फेरीचे



आयोजन करून पालकांना त्या माध्यमातून जनजागृती करून प्रबोधन केले म्हणून परीक्षा ही भीती मुक्त व्हावी आणि त्या माध्यमातून आपण आपल्या आई-वडिलांचे गावाचे आणि शाळेचे सुद्धा नाव उज्वल करावे अशी सुद्धा अपेक्षा डॉ.उज्जैनकर यांनी याप्रसंगी केली.प्रसंगी विद्यार्थ्यांनी सुद्धा या मेळाव्यामध्ये सहभाग नोंदवला प्रसंगी विविध विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी पालक श्री शांताराम प्रल्हाद कोळी श्री प्रवीण अंबादास चौधरी सुरेश समाधान जाधव श्री नितीन सुधाकर अंदुरकर श्री विजय मनोहर पाटील सर्व राहणार पारंबी आणि हिवरा येथील सौ.हनाज रमजान तडवी आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी या पालक शिक्षक मेळाव्याचे आभार विद्यालयाचे शिक्षक श्री संतोष ठाकूर सर यांनी केले.

# दोस्ती फाऊंडेशनच्या वतीने लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृतीगौरव पुरस्कार सोहळा संपन्न..!

श्रीरामपूर (मुंबई प्रतिनिधी): दोस्ती फाऊंडेशनच्या वतीने आयोजित लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृतीगौरव पुरस्कार सोहळा शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्री. महावीरसिंग चौहाण (साहित्यिक तथा प्रा. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन राणीताई सोनवणे (RTO, श्रीरामपूर) व संदीपकुमार बोरकर (राज्याध्यक्ष, राष्ट्रीय लोककलावंत न्याय समिती) यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी श्री. सुभाष सोनवणे (मा. पोलीस अधिकारी), डॉ. सलीम शेख (बैतुशिपा फाउंडेशन) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच दैनिक राष्ट्रसह्याद्रीचे संपादक श्री. करण नवले, दिव्यांग लोककलावंत संघर्ष, न्याय हक्क समिती अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष श्री. नाना डोंगरे, ह.भ.प. सुनीताताई वाळुंज (ज्येष्ठ साहित्यिका) आणि लय भारी प्रोडक्शनचे संस्थापक श्री. प्रमोद सूर्यवंशी (शापित ग्रंथ लघुपट लेखक/दिग्दर्शक) यांची विशेष उपस्थिती लाभली.

या स्मृतीगौरव पुरस्कार सोहळ्यात दोस्ती फाउंडेशनच्या वतीने काव्य प्रतिभा



पुरस्कार देऊन राहुल शेडगे (रायफुल) यांना सन्मानित करण्यात आले. याबद्दल दोस्ती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गझलाकार रज्जाक शेख सर व संपूर्ण फाउंडेशन मंडळाचे आभार व्यक्त करताना मनस्वी आनंद होतो.

मान्यवरांची उपस्थिती, लोककलावंतांचा सहभाग आणि विचारप्रवर्तक मांडणी यामुळे हा पुरस्कार सोहळा दिमाखात व यशस्वीपणे पार पडला.

#रायफुल


# दापोलीत संत रोहिदास जयंती धुमधडाक्यात साजरी !!

१फेब्रुवारी २०२६ रोजी माघ पौर्णिमा या निमित्ताने संत रोहिदास महाराज यांची ६२९ वी जयंती सर्वत्र साजरी करण्यात आली. याच अनुषंगाने रत्नागिरी जिल्हा, दापोली तालुक्यातील संत रोहिदास समाजाच्या आठ विभागात जयंती धूमधडाक्यात साजरी करण्यात आली. याचाच एक भाग म्हणून "उंबर्ले गटाची जयंती करजगाव चिपळुणकर वाडी" या ठिकाणी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सुदेश चिपळूणकर होते. प्रत्येक गावातून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. संत रोहिदास महाराज- छत्रपती शिवाजी महाराज- महात्मा जोतिराव फुले- सावित्री माई फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी बहुमोल असं सामाजिक प्रबोधन मा. "श्री महेंद्र जालगावकर" सत्यशोधक समाजाचे (महाराष्ट्र राज्य कार्यकर्ते) यांनी आपल्या बहुमोल अशा विचाराने सर्व जमलेल्या आपल्या समाज बंधू आणि भगिनी तसेच तरुण वर्गाला आपल्या विचार वाणीने मंत्रमुग्ध करून सोडले. "आपले संविधान"



यावर बहुमोल असं मार्गदर्शन केले. करजगाव मुंबई बंधू-भगिनी यांनी पुन्हा कार्यक्रम करण्यासाठी निवेदन देण्यात आले. आणि "दि ग्रेट महेंद्र" अशी पदवी देऊन सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदानंद चिपळूणकर आणि प्रकाश जालगावकर उंबर्ले यांनी केले.

# भारतीय 77 व्या प्राजास्ताक दिना निमित्त कल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थांच्या वतीने संविधानाचे वाटप



संविधान वाटप

भारतीय 77 व्या प्राजास्ताक दिना निमित्त कल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थांच्या वतीने संविधानाचे वाटप नासिक जिल्हातील देवळाली कॅम्प 150 वर्षीची ऐतिहासिक झेंडा चौक येथे ध्वजारोहण सोहळा ब्रिगेडियर एन,आर, पांडे साहेबांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सि,ओ, अभिषेक मणी त्रिपाठी साहेब , शासन नियुक्त उपाध्यक्ष सचिनभाऊ ठाकरे सह मान्यवर उपस्थित होते यावेळी कल्याण मित्र सघाचे अध्यक्ष रविंद्र दादा जगताप यांच्या हस्ते भारतीय संविधानाचे वाटप करण्यात आले व डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन व रिपाइं नेते सुभाष कापसाबाई पोपटराव बोराडे यांना संस्थेचे अध्यक्ष रविद्र जगताप यांच्या हस्ते सविधान देवून सत्कार केला याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते एन,डी, गोडसे,माजी मुख्याध्यापक कृष्णा लोखंडे सर , संविधानाचे अभ्यासक व बौद्धचार्य विलास (किलेश) पोपटराव बोराडे ,रिपाइं जेष्ठ नेते जिल्हा जमिलभाई सैय्यद, झेंडा चौक समीतीचे आयोजक रवींद्र भदाणे , विलासराव धुर्जड,राजेंद्र जाधव, भरत वाघमारे,वसंत जाधव , जेम्स आण्णा बर्नाड, रिपाइं देवळाली कॅम्प युवक शहराध्यक्ष रवींद्र गायकवाड, रिपाइं नेते सजय जाधव,पंडितराव साळवे,बाळू दोन्दे,राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष ॲड बाळासाहेब आडके, बांधकाम व्यावसायिक विक्रांत बागुल, चंद्रकांत माळी,अरुण कुंवर सह देवळाली कॅम्प जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा कौशल्यां मुळाणे , सेविका चंद्रप्रभा भागवत केदारे, कल्पना रामराजे छायाताई हाबडे, लक्ष्मी पेटारे सौ भारती गायधनी, सह मान्यवर उपस्थित होते आलेल्या प्रमुख व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते या वेळी आयोजकांनी चहा नाश्ताची उत्तम सोय केली तर तिरंगी झेंडे व लाईटीग लावून रांगोळी काढून चौक शुशोभीकरण केला होता

# जायंट्स मेट्रो तर्फे अंधशाळेत मिठाई वाटप



कोल्हापूर : देशात स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन दिवस राष्ट्रीय सण म्हणून साजरे केले जातात . या दिनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्मे पत्करलेल्या हुतात्म्यांचे आपण स्मरण करतो. देशाच्या विकासात अंध बांधवांचेही योगदान राहीले आहे.आपणही चांगले कलागुण अवगत करून देश सेवा करू शकतो. जिद्दीने शिकत रहा असे मार्गदर्शन नुकतेच भूतानमध्ये त्यांच्या साहित्य सेवेबद्दल गौरविण्यात आलेले जेष्ठ कवी बाळासाहेब तोरस्कर यांनी अंध विद्यार्थ्यांना केले.

जायंट्स ग्रुप ऑफ मेट्रो च्या वतीने कोल्हापूर येथील ज्ञान प्रबोधन संचलित अंधशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व मिठाईचे वाटप हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी जायंट्स चे अध्यक्ष सुनील बराले होते. प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदनानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमात कार्यवाह हिलाल कुरेशी, जेष्ठ पत्रकार शिवाजीराव यादव ,बाबुराव पाटील, शिवाजीराव हिलगे आदी मान्यवरांच्या हस्ते मिठाईचे वाटप करण्यात आले.

# वनवासी कल्याण आश्रम, चिंचवली

## 'रानपाखरं' च्या ७५ व्या अंकाचा प्रकाशन सोहळा संपन्न



वनवासी कल्याण आश्रम विद्यार्थी वसतिगृह, चिंचवली केंद्र, पनवेल येथे २४ जानेवारी २०२६ रोजी 'रानपाखरं' या मासिकाच्या ७५ व्या अंकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या अंकाचे प्रकाशन आश्रमातील मुलांच्या हस्ते करण्यात आले, ज्यामुळे मुलांमध्ये आनंदाचे वातावरण होते. या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. 'रानपाखरं'च्या संपादिका मृदुला परचुरे यांनी 'रानपाखरं'च्या प्रवासावर प्रकाश टाकला. सह-संपादिका सुवर्णा भट यांनी साहित्याचे महत्त्व विशद केले. कोकण प्रांत संघटन मंत्री प्रदीपजी पाटील यांनी संघटनेची भूमिका व कार्यावर मार्गदर्शन केले. ज्योतीताई जपे व प्रियाताई आचवल यांनी शिक्षण आयामाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी वरिष्ठ कार्यकर्ते कोचरेकर काका, हेमांगी भागवत आणि माजी पालक भाटवडेकर यांचीदेखील प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वरूप, कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन चिंचवली केंद्रप्रमुख विवेक फुफाणे यांनी केले. उपस्थितांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचा समारोप प्रियाताई आचवल यांनी आभार मानून केला. 'रानपाखरं' हा अंक कै. सुनीताताई गोगटे यांनी २००४ साली वनवासी मुलांसाठी सुरू केला. हा अंक वनवासी कल्याण आश्रमच्या आश्रमशाळा, वसतिगृहे व संस्कार केंद्रांमध्ये वितरित केला जातो. वनवासी, ग्रामीण व शहरी भागात हा अंक त्याच्या वैविध्यपूर्ण माहिती, सदरं व आकर्षक मांडणीसाठी लोकप्रिय आहे.

# " गुरू रविदास एक महान वैज्ञानिक संत "- प्रा.अरुण बुंदेले

## सर्वोदय कॉलनी येथे गुरू रविदास जयंती संपन्न

अमरावती ( प्रतिनिधी )

गुरू रविदास एक महान वैज्ञानिक संत' होते. त्यांचे विचार आधुनिक,तार्किक आणि मानवतावादी होते.जरी त्यांनी प्रयोगशाळेत संशोधन केले नसले,तरी त्यांचे विचार तत्कालीन सामाजिक रूढी-परंपरांना छेद देणारे आणि विज्ञानाप्रमाणेच 'सत्यावर' आधारित होते.त्यांना वैज्ञानिक संत का म्हणतात तर कार्यकारणभाव विज्ञानाचा पाया हा 'कारण आणि परिणाम' यावर असतो. संत रविदासांनी अंधश्रद्धेला विरोध करताना नेहमी तर्काचा आधार घेतला. "जर दगडात देव असेल, तर तो पाण्यात का बुडतो?" असा प्रश्न विचारून त्यांनी लोकांना चमत्कारांऐवजी वास्तवाकडे पाहण्यास प्रवृत्त केले. त्या काळी समाजात वर्णभेद टोकाला होता.रविदासांनी असा *वैज्ञानिक दृष्टिकोन मांडला की, सर्व मानवांच्या शरीरातील रक्त, मांस आणि हाडे एकसारखीच आहेत."एकै माटी के सभ भांडे, सब को सिरजनहार।" याचा अर्थ असा की, आपण सर्व एकाच तत्त्वापासून बनलो आहोत. हा विचार आजच्या 'जेनेटिक्स' किंवा 'बायोलॉजी'च्या समतेच्या सिद्धांताशी जुळणारा आहे,म्हणूनच त्यांना वैज्ञानिक संत म्हणतात." असे विचार साहित्यिक प्रा.अरुण बुंदेले यांनी व्यक्त केले.

ते सर्वोदय कॉलनी, अमरावती येथे संत रोहिदास महाराज सांस्कृतिक भवनातील माजी कुलगुरू स्व. दिलीप मालखेडे वाचनालयामध्ये दि.1 फेब्रुवारी 2026 रोजी संपन्न झालेल्या श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख वक्ते पदावरून विचार व्यक्त करीत होते.



सर्वोदय कॉलनी, अमरावती येथे श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन करताना मान्यवर.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सुधाकरराव नाचणे,प्रमुख वक्ते समाजप्रबोधनकर्ते प्रा.अरुण बुंदेले,प्रमुख अतिथी डॉ.राजीव जामठे ,प्रा.संजय खडसे,श्री वासुदेव वानखडे, डॉ.दिनेश रोजतकार,डॉ. तुषार रामराव गावंडे,राजन खंडारे, चंद्रशेखर खंडारे,भीमराव विरूळकर, रामदास इंगळे, कृष्णा मोहोकर, श्री मधुकर बुंदिले,श्री किशोर खडसे होते .

अध्यक्ष ,प्रमुख वक्ते व प्रमुख अतिथी यांनी श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

अभंगकार प्रा.अरुण बुंदेले यांनी स्वरचित "श्री संत गुरू रविदासजी " या स्वरचित हिंदी काव्यगीताचे गायन केले.

कार्यक्रमाचे संचलन श्री मधुकर बुंदिले तर अभार श्री कृष्णा मोहोकर यांनी मानले.

कार्यक्रमाला समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूल्यनिष्ठ भाषांतरः बा ! तथागता .डॉ फुला बागूल

खानदेशातील सुप्रसिद्ध लेखक व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा संकुलाचे संचालक प्रोफेसर म . सु . पगारे यांनी ' बा तथागता ' हे दीर्घ काव्य निर्माण केले .
पाहता पाहता या दीर्घ काव्याची अनेक भाषांत सुरम्य भाषांतरे झाली .
अलीकडे या दीर्घकाव्याचे अहिराणी रूपांतरण सुप्रसिद्ध कवी व गझलकार वा . ना . आंधळे यांनी केले .
जळगावच्या प्रशांत प्रकाशनाने मूळ दीर्घकाव्याचे व या अहिराणी भाषांतराचेही प्रकाशन केले आहे .

भाषांतराला प्रतिनिर्मिती म्हटले जाते .
मूळ लेखकाइतकेच प्रातीभ कौशल्य त्यासाठी खर्च करावे लागते .
भाषांतरकाराने केलेले भाषांतर प्रत्येकच वेळी प्रतिनिर्मिती होईल असे नसते .
त्यामुळे भाषांतर करणे ही अत्यंत जबाबदारीने करावयाची सृजन प्रक्रिया आहे .
साधारणपणे ही बाब सर्वज्ञात आहे की भाषांतरकाराला मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा या दोन्हींचे ज्ञान असणे अपरिहार्य आहे .

भाषांतरकाराला केवळ भाषेचे ज्ञान असून उपयोगाचे नाही .चांगल्या भाषांतरासाठी ते तर अजिबात पुरेसे देखील नाही .
लक्ष्य भाषेचे ज्ञान असणे यात अनेक गोष्टींचा समावेश असतो .
वर्णनात्मक पद्धतीचे भाषाज्ञान किंवा विविध भाषाभ्यास पद्धतीचे ज्ञान हे भाषा विषय विद्यार्थ्यांना शिकविण्या पुरते ठीक आहे .
भाषांतरकाराला उपरोक्त सर्व भाषा अभ्यास पद्धती प्रमाणेच समाजभाषाविज्ञान या अभ्यास पद्धतीचे मूलभूत ज्ञान असणे अपरिहार्य आहे .
पानीपतावर एक लाख बांगडी फुटली या वाक्याचे इंग्रजी भाषांतर One lakh bangles were broken at Panipat असे फसवे व भाषांतर व्यवहाराला कलंकित करणारे भाषांतर चालत नाही .बांगडी फुटणे या वाक्प्रचाराला मराठी प्रांतात सामाजिक संदर्भ आहे . रूढी परंपरांचा संदर्भ आहे . संस्कृतीचा संदर्भ आहे .विधवा झालेल्या भगिनीच्या बांगड्या फोडल्या जातात . तिची आभूषणे उतरवली जातात .हा सामाजिक संदर्भ माहीत नसेल तर वरील प्रमाणे नकली , तकलादु भाषांतर निर्माण होते .
भाषांतरित साहित्यकृतीने मूळ साहित्यकृतीकडून अपेक्षित असलेले अनुभव वाचकाला द्यायला हवेत .
भाषांतर केवळ साहित्यकृतीचे नसते तर ते त्या साहित्यकृतीत आविष्कृत झालेल्या लोकसंस्कृतीचे भाषांतर असते .यामुळे भाषांतर काराला लक्ष्य भाषा ज्या संस्कृतीत , ज्या समाजात बोलली जाते त्या समाजाच्या संस्कृतीचे पूर्ण भान असणे अपरिहार्य आहे .थोडेफार व्याकरण सांभाळून केवळ प्रतिशब्द देत जाणे म्हणजे भाषांतर नव्हे .
ज्या भाषेत भाषांतर करावयाचे त्या लक्ष्य भाषेची प्रकृती देखील भाषांतरकाराने लक्षात घेतली पाहिजे .
अहिराणी ही आकलनसुलभप्रचूर आहे . प्रासादिक आहे .अहिराणीच्या या क्षमतेचा चांगला वापर भाषांतरकाराने प्रस्तुत





भाषांतरात केला आहे . याचे एक उदाहरण खालील प्रमाणे -

"बा, तथागता ! / खुदले 'बुद्ध/' म्हन्शीनी घोषित करं / बाकीनास्नी तुल्हे 'देव' /करानं ठरायेल व्हतं तरीबी. /

बठ्ठा जगना कल्यानना रस्ता / तुन्ह्या / मानोसकीन्या संसकारेस्थायी / लांभालचक कया / मानशे मानशे म्हातल्या हालक्या भारीन्या पायथऱ्या / तुन्हा तत्त्वेस्थायी / इचारेस्थायी / मूयसकट उपाडी फेक्यात / आन / मानूस मानूस आन त्यान्हं मानूसपन / समताना सुईवन्हे शियी टाकं "( पृ .३९)
तथागताच्या एकूण मानवतेच्या कार्याचा हा सारांश अगदी अप्रतिमपणे अहिराणीच्या सामर्थ्यासह भाषांतरात उतरला आहे .अहिराणी बोलणाऱ्या सामान्यातल्या सामान्य माणसाला यातला सार सहजपणे समजेल असे खात्रीपूर्वक म्हणता येते .
मूळ साहित्यकृतीतील भाव संवेदना , मूळ साहित्यकृतीतील संवादी शैली , मूळ साहित्य कृतीतील कथनात्मकता व कथन ओघ प्रस्तुत भाषांतर कृतीत चांगला उतरला आहे -
याचे हे सर्वोत्कृष्ठ उदाहरण -

"बा, तथागता !/ शाक्य-कोलियासना / पानीनं संकट मिटनं /हाई आनन वार्ता / तुन्हालांगे उनी/ म्हन्शीनी /तुन्हा सोधना परवास थांबी का../ अं हं / बिलकुल नई / तू इचार करा पलघडी... /

आखो भिडना / नवा उमेदथायी सोध लेवाले /खराना सोधगुंता / ते समजी लेवागुन्ता !"( पृ .५०)

बौद्ध तत्त्वज्ञान व त्याच्याशी संबंधित तत्त्वचर्चा हा प्रांत खरेतर गहनच . तथापि मूळ कवी आणि भाषांतरकार दोहोनी हा तत्त्वसार सोपा करून सांगितलाय .
या तत्त्ववेत्त्यांना श्री आंधळे यांनी जी विशेषणे योजली ती अहिराणीचे सौंदर्य सिद्ध करणारी आहेत .
नियतीवादना म्होरक्या , ग्यानी , मास्तर , ही ती विशेषणे होत .

येडा चाया नी दात काया - म्हण -(पृ .५३)
आपुरा सपुरा - अंशाभ्यस्त शब्द ( पृ .५६)
गुनना मुनना (पृ .५७)
बारीक निरिक (पृ .५७)
चाफलं खास अहिराणी शब्द ( पृ .५७) हे या भाषांतराचे वैभव वाढविणारे बिंदू आहेत .

सोप्या शब्दात स्पष्टीकरणाचे हे उदाहरण - पटीसंधी म्हणजे दुसरीकडे चिटकस ( पृ .६१) हीच ती प्रासादिक शैली होय . हीच शैली मूळ साहित्यकृतीतही आहे . यामुळेही हे भाषांतर मूल्यनिष्ठ भाषांतर ठरते .
ज्या भाषांतर प्रक्रियेत मूळ भाषेतील शब्द, शब्दरचना आणि आशय, शैली यांचे तंतोतंत अनुकरण केले जाते, त्यास 'मूल्यनिष्ठ भाषांतर' असे म्हणतात.

ज्या भाषांतर प्रकारात शब्दरचना, वाक्यरचना, शैली भिन्न असते. परंतु मूळ भाषेतील आशयाला अनुसरूनच भाषांतर केले जाते, त्यास 'लक्ष्यनिष्ठ भाषांतर' असे म्हणतात.

अशा भाषांतराच्या व्याख्या पूर्वसुरींनी केल्या आहेत .

या व्याख्यांचा विचार करता सदर भाषांतर हे मूल्यनिष्ठ भाषांतर या प्रकारात मोडते .

अस्सल अहिराणीची शब्दरूपे भाषांतरकाराने योजली आहेत .
उदा . हावहुभारी (११०)
आपरूप (११०) कारोन्या , ललापत्या (१६६)
आयधीपन , गयमानापन (१५९)
गलेपते , पलघडी ,
खल्ली , सरलाट (८२) ही अन्य लक्षणीय उदाहरणे होत .
ठानबंदी हा एकचित्त या अंगाने प्रचंड योग्य शब्द आहे .

अहिराणीची प्रकृती यथास्थिती सांभाळणारे हे भाषांतर आहे . उदा .
" त्याम्हाई येस डवरी आंकुर ( ११३) अशी उदाहरणे पानापानावर आहेत .
आकलनसुलभतेच्या अंगाने हे भाषांतर प्रासादिक आहे . उदा . प्रतित्य म्हंजे टेका लिसन ऱ्हानं (१११)

बौद्धतत्त्व समजून सांगण्यासाठी दिलेले दाखले भाषांतरातही तेवढेच आकर्षक रीतीने उतरले आहेत .
उदा -
"तव्ह तू बोलना /मीबी शे/
कास्तकार /सरध्दा हाई मन्हं बीज/ तपश्या हाई पावसाया/ ग्यान हाई दुश्यर आन नागर/ आपला आपला आबम्हा ऱ्हानं हाऊ दंड/ इचार हाई दुश्यर बांधानी दोरी / कायजी हाऊ नागरना फाय / आन तुमन्हागत /मी बी करस खेती / आन पिकाडंस / आननं पीक /जठे ऱ्हात नई /
दुकना /
ठावठिकाना. "(१७१)
दोषस्थळे :
बा तथागता या कवी प्रा . म . सु . पगारे यांच्या मूळ साहित्यकृतीचे हे भाषांतर सरस झाले आहे .
अहिराणी भाषकांची चांगली सोय या भाषांतराने केली आहे .
या भाषांतराने अहिराणी या भाषेची सक्षमता या अंगाने सिद्ध केली आहे .
या भाषांतरात काही किरकोळ दोष राहून गेले आहेत .
दांभिकपण (११९) या मूळ शब्दाचे अहिराणी रूप द्यायला हवे होते . करतंस काय नि सांगतस काय असा काहीसा शब्दप्रयोग येथे करता आला असता . याभिचार हे व्यभिचारचे अहिराणी भाषांतर नाही . छिनालपना / सिंदयकी ही रूपे हवी होती . आपसूक ऐवजी त्यान त्यानं हे रूप अधिक योग्य ठरले असते . लास्टाकेलपना (१५८) हे रूप प्रत्यक्षात लाजटाकेलपना असे आहे .
धाकटा मोठा (१६७) हे रूप धाकला जेठा असे हवे होते .
धुरधुरते हा शब्द धुरते धुरते असा हवा होता .
बुद्धत्वो प्राप्तीनी याचे भाषांतर बुद्ध व्हवानी परापात असे हवे होते .
झांबल चाफल चा अर्थ कंसात ( न्यायनिवाडा ) असा दिला आहे . तो त्याचा अर्थ नाही . शोधाशोध या शब्दाची अर्थच्छटा त्यास आहे .
हवा (७६) ऐवजी हावा असे रूप हवे होते .
रुलथायी ऐवजी नियम थायी असे हवे होते .
समशान ऐवजी म्हसनखाई ( पृ .८१) असे रूप हवे होते
रूपावचर भूमी (पृ ८१) याला अहिराणी प्रतिशब्द हवा होता .
दिपावनारी बुद्धी - हे भाषांतर नाही .
भव जाती जरा ( पृ .९५) हे देखील भाषांतर नाही . भाहीर
( १०१) बाहीर अशी एकाच शब्दाची भिन्न रुपे येथे दोष निर्मिती करतात .

ही किरकोळ त्रुटिस्थाने वगळता हे भाषांतर सरस झाले आहे यात शंका नाही .

डॉ फुला बागूल
सदस्य विद्वत परिषद / कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव
संपर्क : 9420605208/9822934874

# अद्भूत रसाचा उत्कठांवर्धक प्रवास : जादुई जंगल

जांदुई जंगल : (बाल कादंबरी)
लेखक : समाधान शिकेतोड
प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे.


पृष्ठे : 134
किंमत : 180 रुपये

समीक्षक : संजय ऐलवाड

-----------------

प्राण्यांविषयी जाणून घेण्याची उत्सुक्ता कायम मुलांमध्ये असते. त्यातल्या त्यात प्राणी बोलणारे असतील, तर मजाच मजा. कारण बोलणाऱ्या प्राण्यांच्या कथेत मुलांना रस असतो. त्यामुळे मनोरंजन करणाऱ्या काल्पनिक गोष्टीत मुले रममाण होतात. कल्पनेसह मोलाचा सामाजिक संदेश देणारी समाधान शिकेतोड यांची 'जादुई जंगल' ही बाल कादंबरी अद्भूत रसाचा उत्कठांवर्धक प्रवास आहे. त्यामुळे ही बाल कादंबरी मुलांच्या भावनांना स्पर्श करून मनात घर करणारी आहे.

या बाल कादंबरीची सुरूवातच प्रसन्न अशा अथाग जंगलात होते. अर्थातच हे जंगल जादुई






आहे. त्यामुळे या जंगलातील प्रत्येक प्राण्यांकडे कोणत्या ना कोणत्या प्रकारचा कला आहे, जादु आहे. त्यामुळे कादंबरीच्या पहिल्या पानासापूसन सुरू झालेला मनोरंजनात्मक प्रवास शेवटच्या पानापर्यंत वाचकांना खिळवून ठेवतो. प्राण्यांना प्राप्त झालेली जादूई शक्ती, त्याचा वेळोवेळी होणारा वापर, आणि जादुच्या माध्यमातून जंगलात होणारे सकारात्मक बदल त्यामुळे वाचकही कळत न कळतपणे जंगलाचाच एक भाग होऊन जातात. कादंबरीतल्या प्रत्येक पानावरचा प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. वाचकांनाही जंगलात वावरत असल्याची अनुभूती येते.

समाज असो की जंगल, या दोन्ही ठिकाणी सकारात्मक आणि नकारात्मक विचार करणारे दोन गट आहेत. मात्र जादुई जंगलात नकारात्मक विचार करणाऱ्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे. तर सकारात्मक विचार करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे जंगलावर किंवा प्राण्यांवर संकट आले की, ते सकारात्मक जादूने दूरही होते. त्यामुळे प्रत्येक घटनेतून मुलांवर सकारात्मक संस्कार होतात. एकीकडे हे संस्कार सकारात्मक आहेत, तर दुसरीकडे ते जादुई आहेत. त्यामुळे या कादंबरीतील प्रत्येक घटना मुलांच्या मनावर परिणाम करते. किंबहुना ती मुलांच्या मनात घर करून मुलांना सकारात्मक विचार करण्यास भाग पाडते. हे लेखक समाधान शिकेतोड यांच्या लेखनीचे यश आहे.

या बाल कादंबरीत ससा, लांडगा, वाघ, रानमांजर, मोर, अजगर, माकडं, हत्ती, बंगळा, पोपट, हरिण आदी प्राणी, पक्ष्यांचा समावेश आहे. यातील प्रत्येक प्राणी, पक्षी सामाजिक संदेशाशी जोडला गेला आहे. बाल कादंबरीतील जंगल, त्याची रचना, त्यातील झाडे, परिसराच्या अचुक वर्णनाने वाचक या कादंबरीशी एकरूप होतो. साधी सोपी भाषा, छोटी छोटी व प्रभावी वाक्ये, प्राणी, पक्ष्यांतील बारकावे, उत्कठांवर्धक प्रसंग आदीमुळे ही बाल कादंबरी अधिक प्रभावी झाली आहे. उत्तम निर्मिती, बोलके मुखपृष्ठ, आशयघन रेखाटने ही या बाल कादंबरीचे वैशिष्ट्ये आहे. या बाल कादंबरीच्या माध्यमातून समाधान शिकेतोड हे मुलांना अद्भूत रसाची भन्नाट जादूई सफर घडवून आणण्यात यशस्वी झाले आहेत. त्यामुळे समाधान शिकेतोड यांचे मन:पूर्वक अभिनंदन. पुढील लेखनास खुप शुभेच्छा.

- समीक्षक : संजय ऐलवाड
पुणे

# प्रवास वर्णन लेखन स्पर्धेत उत्तम सदाकाळ यांचा राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक



ता.31 पुणे प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी राज्यातील सर्व शिक्षक, अधिकारी यांचेसाठी विविध स्पर्धाचे आयोजन केले होते. दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत कोल्हापूर,पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, लातूर, नाशिक, अमरावती या आठ विभागातील एकूण छत्तीस जिल्ह्यातील स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करंजाळे, केंद्र- मढ, ता. जुन्नर या शाळेतील पदवीधर शिक्षक श्री. उत्तम निवृत्ती सदाकाळ यांनी "नीलगाईच्या शोधात..." हा लेख लिहून 'प्रवास वर्णन लेखन' स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळविला.

उत्तम सदाकाळ यांनी या यशामुळे करंजाळे गावाचे, जुन्नर तालुक्याचे व पुणे विभागाचे नाव उंचावल्याने त्यांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, पुणे जिल्हा परिषदेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार तसेच अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत असणाऱ्या उत्तम सदाकाळ यांची 'पाऊस' कविता इयत्ता दुसरीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असून त्यांचा 'कमाई' बालकथा संग्रह शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे यांनी इयत्ता चौथी ते पाचवीच्या मुलांसाठी समग्र शिक्षा तर्फे प्रकाशित केलेला आहे.

उत्तम सदाकाळ यांनी "नीलगाईच्या शोधात" या प्रवास वर्णनात आजोबा गडावरील रोमांचक सफरीचे वर्णन केले आहे. नीलगाई बघण्यासाठी आजोबागड येथे गेलेल्या उत्तम सदाकाळ व त्यांच्या मित्रांना या प्रवासादरम्यान आलेले रोमहर्षक व सुरस अनुभव अतिशय सुंदर रीतीने लिहून उत्तम सदाकाळ यांनी या स्पर्धेत बाजी मारली.

प्रवास वर्णन लेखन स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत लवकरच सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे.

दैनिक लोकआरंभ
बुधवार ४ फेब्रुवारी २०२६
www.lokaarambh.com



# नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी रुग्णसेवेचे प्रमाणीक कर्तव्य बजावले पाहीजे-ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर

## विडा येथिल रेणुका नर्सिंग स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा शपथग्रहण व दिपप्रज्वलन कार्यक्रम संपन्न...

केज ! प्रतिनिधी
नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी निस्वार्थ सेवा,करुणा,आणी समर्पण या मूल्यांचे पालण करत नर्सिंग व्यावसायातील आपल्या जबाबदार्या समजून घेऊण रूग्णसेवेचे प्रमाणीकपणे कर्तव्य बजावले पाहिजे असे प्रतिपादन ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले. रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित रेणूका नर्सिंग स्कूल विडा येथिल GNM प्रथम वर्षातील विद्यार्थांचा शपथ ग्रहण सोहळा व दिपप्रज्वलन ( #LAMP_LIGHTING & #OATH_TAKING_CEREMON) कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते.कार्यक्रमाचा शुभारंभ ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर (साधू शिवरामपुरी मठ संस्थान विडा यांच्या शुभहस्ते तर संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.नर्सिंग व वैद्यकीय क्षेत्रातील सद्यस्थिती,भविष्यातील संधी तसेच गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा व करिअरच्या संधी यावर संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.प्रसंगी विडा प्रा.आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी रोशनकुमार गायकवाड,आंधळेवाडीचे सरपंच नामदेव आंधळे,जेष्ठ नेते अशोक वाघमारे,युवा नेते ऋषिकेश पटाईत,सुंदर



जाधव,कृष्णा अर्बन बँकेचे उपाध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी,संस्था समन्वयक नवनाथ काकाड सर,विशाल इंगळे सर,शिवरामपुरी पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुनिता पवार,



रामकृष्ण महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक राम काटकर सर,लिंबराज ढेंगे,बप्पा बर्दापूरकर,चौरे साहेब,किशोर देशमुख,तुषार राऊत रेणुका नर्सिंग स्कूलचे प्रा.रवि मुळे,सौ.



सुनिता मुंडे मॅडम,शिंदे सर,देशमुख सर,केदार सर,हांडगे सर यांच्यासह विद्यार्थी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उसणे दिलेले पैसे परत मागितल्याचा राग: मित्रानेच केला मित्राचा घात रायमोहातील खुनाचे गुड उलगडले; स्थानिक गुन्हे शाखेने काही तासातच आरोपीला बेड्या ठोकल्या

शिरूरकासार/प्रशांत बाफना बीडजिल्ह्यातील रायमोहा (ता. शिरुर कासार) जवळील दगडवाडी शिवारात सोमवारी (दि.2) राजुरी नवगन -चिंचपूर मार्गावर बाजूच्या खड्यात चाँद अल्हाहुद्दीन तांबोळी वय 30 रा. रायमोहा याचा मृतदेह अढळून आला होता. व्यवसायाने पेंटर असलेल्या चाँदच्या हत्येने जिल्हाभरात खळबळ उडाली होती. पोलिसांसमोर खुनाच्या तपासाचे मोठे अव्हान होते मात्र, पोलीस अधिक्षक नवनित कॉवत यांच्या आदेशाने पोलिस निरिक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्ह्याची प्रक्रिया पूर्ण होताच अवघ्या काही तासात आरोपीला बेड्या ठोकल्या. रायमोहा येथील व्यवसायाने पेंटर असलेल्या चॉद अल्हाहुद्दीन तांबोळी हा रविवारी (दि.1) रात्री सकाळी 10:00 वाजता बीड येथे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला. सायंकाळी मालकीच्या मोटारसायकलवरून बीडहून परतत असताना रात्री 7:45 वाजता खोकरमोहा शिवारात मोटारसायकल लावली आहे ती घेवून जा, कामानिमीत्त निरगूडी (ता. पाटोदा) येथे जात असल्याचे आरबाज खलिल तांबोळी यास फोनवरुन सांगितले. त्यानंतर नातेवाईकांनी त्यास फोनवरुन संपर्क साधला असता मी हिवरशींगा येथे आलो असल्याचे सांगितले मात्र, त्यानंतर दोन मोबाईल पैकी एक फोन बंद येऊ लागला आणि दुसर्‍या फोनवर प्रतिसाद मिळत नव्हता. नातेवाईकांनी त्याचा सर्व नातेवाईकांकडे शोध घेतला मात्र तो मिळून आला नाही. अखेर पहाटे शिरुर कासार पोलिस ठाणे गाठून नातेवाईकांनी मिसिंगची तक्रार दाखल केली. सोमवारी (दि.2) सकाळी महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या एकाने पाटोदा पालिसांना (रायमोहा चौकी) दगडवाडी शिवारात रस्त्याच्या बाजूला खड्ड्यामध्ये रक्तभंबाळ अवस्थेत तरुण पडल्याची माहिती दिली. मिळालेल्या माहितीवरुन पोलिसांनी घटनास्थळ गाठत तरुणाची ओळख पटवून नातेवाईक, ग्रामस्थांच्या मतदीने पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी रायमोहाच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. घटनास्थळाच्या पाहणीतून चाँद याच्या डोक्याला मागील बाजूस दगडाने ठेचल्याची खोलवर जखम होती. शिवाय, त्यास रोडवरुन फरफटत खड्ड्यात आणून फेकल्याचे दिसून आले. सरळ, संवेदनशिल स्वभावाच्या चाँदच्या हत्येने जिल्हाभरात खळबळ उडाली होती. पाटोदा पोलिसांसमोर तपासाचे मोठे अव्हान होते, रात्री उशीरापर्यंत पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीच्या शोधासाठी पथक स्थापन करण्यात आले. पोलिसांनी प्रथम त्याच्या कामापासून तपासाला सुरूवात केली काहींची चौकशी केली. चाँद याचा मोबाईल लोकेशनवरून एकाचे वेळी चॉद व इतर मोबाईल नंबरच्या स्ट्रेसवरुन अतिक गुलाब तांबोळी रा. ईस्लामपुरा पेठ बीड याचे लोकेशन मिळाले. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून आरोपी मागावर असलेल्या पथकास अतिक बीडच्या शासकिय रुग्णालय परिसरात मिळून आला. त्यास प्रथम विचारपुस केली असता तो पोलिसांना उडवा उडवीची उत्तरे देत होता. परंतु पोलिसांनी खाक्याचा दम दाखवताच आरोपीने गुन्हा कबुल करत मी चाँद तांबोळी याच्याकडून हात उसने पैसे घेतले हाते. सरदचे पैसे परत घेण्यासाठी चाँद तांबोळी याने तगादा लावल्याचा राग मनात धरुन चाँद अल्हाहुद्दीन तांबोळी याची डोक्यात दगड मारुन हत्या केल्याची कबुली दिली . दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासात खुनाचे गुड उलगाडून आरोपीस बेड्या ठोकल्याने नागरिकातून पोलिस कर्तव्याची कौतुक होत आहे. पोलीस निरिक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरिक्षक सुशांत सुतळे, श्रीराम खटावकर, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, राहुल शिंदे, मारूती कांबळे, युनूस बागवान, श्री. यादव, श्री.सुरवसे, अशफाक, श्री. परझणे, शेख, हराळे यांची पथकामध्ये नियुक्ती करण्यात आली होती. पाटोदा पोलिस पुढील तपास करत आहेत.




## नगर तालुक्यात ड्रायव्हरचे हातपाय बांधून ट्रकमधील गव्हाचे 953 कट्टे लंपास...



अहिल्यानगर/ प्रशांत बाफना ड्रायव्हरचे हात पाय बांधुन ट्रकमधील गव्हाचे पोते लुटणारे 04 आरोपी 35,40,000/- रुपये किमतीचे मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर यांचेकडुन जेरबद प्रस्तुत बातमीची हकीगत अशी की, फिर्यादी श्री जगदिश चतृभुज माळी वय 55 वर्षे, रा. लहुजा, ता. सितामऊ, जि. मंदसौर, मध्यप्रदेश हे त्यांचेकडील टाटा कंपनीची गाडी क्रमांक आर. जे. 09 जी. ई. 5957 हिमध्ये मध्यप्रदेश राज्यातुन गहु भरुन सोलापुर या ठिकाणी घेवुन जाण्यासाठी निघाले असतांना दिनांक 27/01/2026 रोजी रात्री 08.30 वा. चे सुमारास देहरे टोलनाक्याजवळ 4 तोंड बांधलेल्या इसमांनी फिर्यादीचे ताब्यातील गाडीमध्ये घुसुन फिर्यादी व क्लिनर यांना चाकुने जिवे ठार मारण्याची धमकी देवुन त्यांचे हात पाय बांधुन गाडीचे केबिनमध्ये झोपवले व गाडीमधील 9,67,200/- रुपये किमतीचे गव्हाचे 953 कट्टे आरोपींचे ताब्यातील गाडीमध्ये भरुन घेवुन गेले तसेच फिर्यादी व क्लिनर यांना निवडुंगे, ता. पाथर्डी शिवारामध्ये गाडीसह सोडुन दिले आहे. सदर घटनेबाबत एम.आय. डी.सी. पोलीस ठाणे गु.र.नं. 67/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 309 (4), 3(5) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा घडल्यानंतर मा. श्री सोमनाथ घार्गे सो, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांना गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले आहे. सदर आदेशानुसार पो. नि. श्री किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वाखाली 03 पथके तयार करण्यात आली होती. सदर पथकामध्ये पोउपनि/अनंत सालगुडे, संदीप मुरकुटे, महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार शाहिद शेख, गणेश धोत्रे, विष्णु भागवत, विजय पवार, दिपक घाटकर, फुरकान शेख, राहुल डोके, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डीले, विशाल तनपुरे, रमिझराजा आतार, प्रशांत राठोड, अरुण मोरे, भगवान धुळे, उत्तरेश्वर मोराळे यांचा समावेश करण्यात आला होता. वरील पथकांनी तात्काळ घटनाठिकाणी भेट देवुन आरोपीचे गुन्हा करण्याची पध्दत तसेच व्यवसायीक कौशल्याचे आधारे आरोपींची माहिती काढत असतांना पथकास सदरचा गुन्हा हा अर्जुनसिंग सरदार रा. कोलारस, जि. शिवपुरी व त्याचे साथीदारांनी सदरचा गुन्हा केल्याची माहिती प्राप्त झाली. सदर माहितीचे आधारे आरोपींचा मध्यप्रदेश राज्यामध्ये शोध घेत असतांना सदरचे आरोपी हे शिवपुरी मध्यप्रदेश येथुन पुणे या ठिकाणी जाणारे असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने आरोपींच्या ट्रकचा पाठलाग करुन सदरची ट्रक नंबर आर. जे. 11 जी. सी. 2704 ही अरणगांव परिसरामध्ये ताब्यात घेतली. सदर ट्रकमध्ये 02 इसम मिळुन आले. सदर इसमांना त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांची नावे 1) अर्जुनसिंग नारायणसिंग सरदार वय 41 वर्षे, रा. कोलारस, ता. कोलारस, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश, 2) सागरसिंग गुरजंदसिंग सरदार वय 44 वर्षे, रा. कोलारस, ता. कोलारस, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश असे असल्याचे सांगितले. ताब्यातील इसमांकडे गुन्ह्याबाबत सखोल व बारकाईने विचारपुस करता त्यांनी त्यांचे इतर साथीदार 3) कल्ला शब्बीरा कोहरी वय 25 वर्षे, रा. कोलारस, ता. कोलारस जि. शिवपुरी, मध्यप्रदेश, 4) रतीलाम मदनलाल मदनलाल कोहरी वय 40 वर्षे, रा. सबालगड, ता. सबालगड, जि. मुरैना, मध्यप्रदेश यांचेसह केल्याची कबुली दिली असुन सदर आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले आहे. आरोपींनी चोरी केलेला गहु विकण्याचे दृष्टीने दुसरे प्लॅस्टीक बारदाना खरेदी करुन चोरीचा गहु सदर बारदानामध्ये भरलेला असुन आरोपींकडुन एकुण 10,40,000/- रुपये किमतीचा 475 गोण्यामध्ये भरलेला एकुण 26 टन गहु, 25,00,000/- रुपये किमतीचा ट्रक क्रमांक आर. जे. 11 जी. सी. 2704 असा एकुण 35,40,000/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ताब्यातील आरोपींना गुन्ह्याचे पुढील तपासकामी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे मुद्देमालासह हजर करण्यात आले असुन पुढील तपास एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदरची कारवाई मा.श्री.सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बीड येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण वर्ग संपन्न :- प्रा. बबनराव आंधळे

बीड/ प्रतिनिधी दिनांक 3. 2 .2026 महाराष्ट्र राज्य सहकार संघ पुणेचे सहकार प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राजुरी वेस बीड या ठिकाणी शनिवार दिनांक 31 1 2026 व रविवार दिनांक 1. 2. 2026 या दोन दिवशीय सहकार प्रशिक्षणसाठी बीड तालुक्यातील नागरी पगारदार, सेवक, कर्मचारी ,पतसंस्थांना संचालक, कर्मचारी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मा.आर.व्ही. उबाळे साहेब यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा सहकार बोर्डाचे उपाध्यक्ष मा. सुहास पाटील साहेब हे होते प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे , मा. के.युव. आघाव साहेब, मा. एस पी. राठोड साहेब लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष माननीय भागवत वैद्यसाहेब झुंजार



नेताचे उपसंपादक आत्माराम वावळ साहेब सेवानिवृत्त मुख्याध्यापक सर्जेराव मोराळे सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम आंधळे सर, ए. एस. कदम साहेब सेवानिवृत्त उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड, ॲड. हनुमंत कांबळे साहेब सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड प्रसिद्ध उद्योजक मा.संतोषरावजी निकाळजे साहेब तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनंदाताई केदार मॅडम, बीड जिल्हा संघटक मा.संजय कुलकर्णी साहेब माननीय बोरखेडे साहेब प्रमाणित रेखापरीक्षक



बीड माननीय चव्हाण साहेब प्रमाणे तलेखा परीक्षक बीड माननीय सातपुते साहेब प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड इत्यादी मान्यवर पहिल्या दिवशीच्या सत्राच्या प्रसंगी उपस्थित होते या दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गात पहिल्या दिवशी माननीय श्री एन एन कुलकर्णी साहेब वसुली अधिकारी सोलापूर व दुसऱ्या दिवशी माननीय श्री खोडसे साहेब प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड तसेच या प्रशिक्षण वर्गाचे संयोजक सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य मा.कोळे साहेब यांनी देखील वसुली संदर्भात चांगले मार्गदर्शन केले तर दुसऱ्या दिवशी समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा.कल्याणराव आखाडे हे होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस मा. राजकुमार कदम सर, मा. डी तांदळे सर मार्गदर्शक मराठवाडा शिक्षक संघ, मा. भारत मोराळे सर व दैनिक मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी दैनिक मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी मा.संदीप बेदरे साहेब इत्यादी मान्यवर उपस्थित होते सदरील कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांचे स्वागत बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांनी केले व नंतर सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य मा. एस आर कोळे साहेब यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता झाली

## नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर महामार्गास मंजुरी ;खासदार नीलेश लंके यांची माहिती

## नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर महामार्गास मंजुरी अहिल्यानगरच्या विकासाला नवी दिशा देणारा महामार्ग

### खासदार नीलेश लंके यांची माहिती

अहिल्यानगर : प्रशांत बाफना केंद्रीय मंत्रिमंडळाने नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर-अक्कलकोट या ६ पदरी, प्रवेश-नियंत्रित (ॲक्सेस कंट्रोल्ड) ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पास मंजुरी दिली असून, हा निर्णय अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्याचा समावेश राष्ट्रीय दर्जाच्या द्रुतगती महामार्ग जाळ्यात होणार असून, दळणवळणाच्या दृष्टीने अहिल्यानगरला नवे महत्त्व प्राप्त होणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. या महामार्गाची एकूण लांबी सुमारे ३७४ किलोमीटर असून, सुमारे १९ हजार १४२ कोटींची गुंतवणूक या प्रकल्पासाठी करण्यात येणार आहे. 'पीएम गतीशक्ती' राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत विकसित होणारा हा महामार्ग पश्चिम किनारपट्टीपासून दक्षिण भारतापर्यंतचा एक महत्त्वाचा दळणवळण दुवा ठरणार आहे. परिणामी राज्यातील आणि देशातील प्रमुख आर्थिक केंद्रांशी अहिल्यानगरचा संपर्क अधिक वेगवान व सुलभ होणार आहे. महामार्गामुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे ४५ टक्के घट होण्याची शक्यता असून, त्याचा थेट लाभ व्यापार, शेती आणि उद्योग क्षेत्राला मिळणार आहे. शेतमाल, दुग्धव्यवसाय तसेच कृषीपूरक उद्योगांच्या वाहतुकीवरील खर्चात लक्षणीय बचत होणार असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) लॉजिस्टिक्स अधिक सक्षम होणार आहे. यासोबतच औद्योगिक, गोदाम, प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रात नव्या गुंतवणुकीस चालना मिळणार असल्याचे अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांसाठी थेट व अप्रत्यक्ष स्वरूपात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. सुधारित दळणवळण व्यवस्था आणि वाढणारी औद्योगिक गुंतवणूक यामुळे जिल्ह्याचा आर्थिक पाया अधिक भक्कम होणार असून, अहिल्यानगर केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे तर आर्थिक व औद्योगिकदृष्ट्याही केंद्रस्थानी येणार आहे. या निर्णयाचे स्वागत करताना खासदार निलेश लंके यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा महामार्ग अत्यंत निर्णायक ठरणार आहे. दळणवळण, व्यापार, शेती, उद्योग आणि रोजगार या सर्वच क्षेत्रांना या प्रकल्पामुळे नवी दिशा मिळेल. केंद्र सरकारने अहिल्यानगरच्या विकास क्षमतेवर दाखवलेला विश्वास महत्त्वाचा असून, या महामार्गाचा जिल्ह्याला जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर ६ पदरी महामार्ग हा अहिल्यानगरच्या भविष्यकालीन विकासाचा कणा ठरणार असून, जिल्ह्याला विकासाच्या नव्या युगात नेणारा हा ऐतिहासिक निर्णय असल्याची भावना व्यक्त होत आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com